दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
। रविवार, दि. २६ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १०८ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION



## अखेर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिला शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा

# विद्यार्थ्यांसमोर सरकार झुकले!

## जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठं यश

**जन सम्राट टाईम्स । मुंबई**

**गेल्या 35 दिवसांपासून दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांकडून सुरु असलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी दुपारी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.**

पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात एखाद्या आंदोलनानंतर किंवा आरोपांनंतर केंद्रीय मंत्र्याला राजीनामा द्यावा लागण्याची ही पहिलीच वेळ आहे.
कॉकरोच जनता पार्टी आणि जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीबाबत कोणतीही तडजोड करणार नाही, असा इशारा देत आंदोलन आणखी तीव्र करण्याची इशारा दिला होता. दिल्लीतील या आंदोलनाचे लोण मुंबई, राजस्थान, बिहार, गुवाहाटी अशा सर्वच राज्यांमध्ये पसरले होते. त्यामुळे आंदोलनाची व्याप्ती आणखी वाढून केंद्र सरकाविरोधात असंतोष वाढत चालला होता. त्यामुळे केंद्र सरकारला अखेर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला आहे. दरम्यान, धर्मेंद प्रधान यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, जंतर-मंतरवर आणि देशात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या परिस्थितीचा राष्ट्रविरोधी शक्तींनी कोणताही फायदा घेऊ नये, देशाची एकता टिकून राहावी, एकाही विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर अडचणीत सापडू नये आणि आपल्या मुलांनी त्यांचा वेळ अभ्यास व करिअर बनवण्यावर घालवावा, याच विचाराने मी माझा राजीनामा मा. पंतप्रधानांकडे पाठवून दिला आहे.कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत असल्याचं पाहायला मिळालं.
कॉक्रोच जनता पार्टीच्या मागण्याच्या पार्श्वभूमीवर २४ जुलै रोजी कॉक्रोच जनता पार्टीचं शिष्टमंडळ आणि केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा आणि मंत्री जितेंद्र सिंह यांच्यात जवळपास २ तास बैठक झाली होती. या बैठकीत कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळाकडून विद्यार्थ्यांच्या मागण्या सरकारसमोर मांडण्यात आल्या होत्या.
याच बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याची माहिती कॉक्रोच जनता पार्टीच्या नेत्यांनी दिली होती. या बैठकीत काय घडलं? याची माहिती सांगताना अभिजीत दीपके यांनी थेट पंतप्रधान मोदींना इशारा दिला होता. “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माझं आवाहन आहे की तुम्ही धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या, जर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा तुम्ही घेतला नाही, तर उद्या तुमची खुर्ची धोक्यात येईल”, असा इशारा अभिजीत दीपके यांनी दिला होता.

### अभिजीत दीपकेंची पहिली प्रतिक्रिया

गेल्या ३६ दिवसांपासून दिल्लीत जंतर मंतरवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या मागणीला यश आलं असून धर्मेंद्र प्रधान शिक्षणमंत्री पदावरुन पायउतार झाले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. “आपण करुन दाखवलं”, असं म्हणत दीपके आणि आंदोलकांनी जंतर मंतरवर जल्लोष केला. “धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. हे काय म्हणत होते की, या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत”, अशी प्रतिक्रिया दीपकेंनी दिली.कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत असल्याचं पाहायला मिळालं. या बैठकीत कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळाकडून विद्यार्थ्यांच्या मागण्या सरकारसमोर मांडण्यात आल्या होत्या.

### पत्रात धर्मेंद्र प्रधान काय म्हणाले?

देशातील तरूणांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटले आहे की, जंतरमंतर आणि देशभरात निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपला राजीनामा पाठवला आहे. गेल्या चार दशकांहून अधिक काळापासून मी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी काम केले आहे. एक मजबूत, सर्वसमावेशक आणि दूरदर्शी शिक्षण व्यवस्था हाच एका सशक्त राष्ट्राचा पाया असतो, यावर माझा नेहमीच विश्वास राहिला आहे. देशातील तरुणांच्या आकांक्षा, भावना आणि रास्त अपेक्षांचा मी मनापासून आदर करतो. भारताच्या तरुण पिढीची स्वप्ने पूर्ण करणे ही राजकीय आणि सामाजिक जीवनातील आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी राहिली आहे. पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली देशाला सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो," असे प्रधान म्हणाले.

### "देशविरोधी शक्तींनी फायदा घेऊ नये"

"जंतरमंतर आणि देशभरात निर्माण झालेली परिस्थिती पाहता यात देशविरोधी शक्तींनी फायदा घेऊ नये, देशाची एकता अबाधित राहावी, एकाही विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर गुंतागुंतीत अडकू नये आणि आपल्या मुलांनी अभ्यासावर व करिअर घडवण्यावर लक्ष केंद्रित करावे.

### कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश

गेल्या एका महिन्यांपासून सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला अखेर मोठं यश आलं आहे. आज (२५ जुलै) केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश आल्याचं बोललं जात आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी मोठा जल्लोष केल्याचं पाहायला मिळत आहे.

## एमआयडीसी ढोर बाजार रोडची दुरवस्था; खड्डयांमुळे वाहनधारक त्रस्त

### औद्योगिक क्षेत्रातील मार्गाची दयनीय अवस्था

**जन सम्राट टाईम्स**



औद्योगिक क्षेत्राला जोडणाऱ्या एमआयडीसी ढोर बाजार रोडची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, जागोजागी पडलेले खड्डे आणि पावसाचे साचलेले पाणी यामुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा रस्ता अपघातप्रवण बनला असून, नागरिक आणि व्यापाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या मार्गावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने, मालवाहू ट्रक तसेच औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी प्रवास करतात. मात्र, रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि त्यात साचलेले पावसाचे पाणी यामुळे वाहन चालविणे धोकादायक झाले आहे. पाण्यामुळे खड्डयांचा अंदाज न आल्याने दुचाकीस्वारांचे अपघात वारंवार घडत असल्याची तक्रार वाहनधारकांनी केली आहे स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्याची दुरवस्था कायम असून, वारंवार तक्रारी करूनही संबंधित प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वाहनधारकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. नागरिकांनी संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींनी या समस्येची तातडीने दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, खड्डे बुजवावेत आणि वाहतूक सुरक्षित करण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

### प्रमुख समस्या

मोठ्या खड्डयांमुळे अपघातांचा धोका वाढला.
पावसाचे पाणी साचल्याने रस्ता चिखलमय.
वाहनांचे वारंवार नुकसान होऊन दुरुस्तीचा खर्च वाढला.
वाहनांचा वेग मंदावल्याने वाहतूक कोंडीची समस्या.
पादचाऱ्यांनाही सुरक्षितपणे चालणे कठीण.

## इशान-तिलकची तुफानी फलंदाजी



हरारे | वृत्तसंस्था : इशान किशन आणि तिलक वर्मा यांच्या आक्रमक अर्धशतकांनंतर भारतीय गोलंदाजांनी केलेल्या शिस्तबद्ध माऱ्याच्या जोरावर भारताने दुसऱ्या टी-२० सामन्यात झिम्बाब्वेचा तब्बल ९० धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेत मालिका खिशात घातली. कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा हा महत्त्वपूर्ण मालिका विजय ठरला. भारताने प्रथम फलंदाजी करताना सुरुवातीला दोन धक्के बसल्यानंतर डाव सावरला. अभिषेक शर्मा ८ धावांवर, तर वैभव सूर्यवंशी २० धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार श्रेयस अय्यर (२५) आणि इशान किशन यांनी तिसऱ्या विकेटसाठी ६६ धावांची भागीदारी करत संघाला सावरले.

## प्रह्लाद जोशींकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त प्रभार

**जन सम्राट टाईम्स**

नवी दिल्ली | प्रतिनिधी: नीट पेपरफुटीच्या वादात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशाच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सूचनेनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रधान यांचा राजीनामा तात्काळ मंजूर केला. यानंतर, केंद्रातील अनुभवी नेते प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण खात्याची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. सध्या ग्राहक व्यवहार, अन्न-नागरी पुरवठा आणि अक्षय ऊर्जा मंत्रालयाचे कामकाज पाहणारे जोशी आता शिक्षण खात्याचीही सूत्रे हाती घेतील.
या नव्या जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर प्रल्हाद जोशी यांची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि राजकीय कारकीर्द नेमकी कशी आहे, याचा आढावा घेऊया.२७ नोव्हेंबर १९६२ रोजी कर्नाटकातील विजयपुरा (विजापूर) येथील एका मध्यमवर्गीय कुटुंबात प्रल्हाद जोशी यांचा जन्म झाला. त्यांचे वडील व्यंकटेश जोशी रेल्वेत सेवेत होते, तर आई मालतीबाई गृहिणी होत्या. अत्यंत साध्या वातावरणात लहानाचे मोठे




झालेल्या प्रल्हाद जोशी यांना विद्यार्थीदशेतच राष्ट्रसेवा आणि सामाजिक विषयांची आवड निर्माण झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी व्यवसायासोबतच सामाजिक उपक्रमांत स्वतःला गुंतवून घेतले आणि पुढे भाजपच्या माध्यमातून सक्रिय राजकारणाचा श्रीगणेशा केला.प्रल्हाद जोशी यांच्या निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, त्यांचे सुरुवातीचे प्राथमिक शिक्षण स्थानिक रेल्वे स्कूलमध्ये झाले. त्यापुढील माध्यमिक शिक्षण त्यांनी हुबळीतील 'न्यू इंग्लिश स्कूल'मधून पूर्ण केले. शालेय शिक्षणानंतर त्यांनी उच्च शिक्षणासाठी धारवाड येथील प्रसिद्ध कर्नाटक विद्यापीठाशी संलग्न असलेल्या हुबळीच्या 'के. एस. आर्ट्स कॉलेज'मध्ये (K.S. Arts College) प्रवेश घेतला. तेथून त्यांनी १९८३ मध्ये कला शाखेतील पदवी (B.A.) प्राप्त केली. पदवीनंतर त्यांनी पूर्णवेळ सामाजिक व राजकीय चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली.

## विठ्ठलनामात रमले पालकमंत्री; एकादशीला भक्तिभावाने विठ्ठल चरणी नतमस्तक"!

### चिंचपूरा, वाघळूद व विविध विठ्ठल मंदिरांत महाआरती

**जन सम्राट टाईम्स**



**पाळधी / धरणगाव / जळगाव | प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी नतमस्तक होत भक्तिभावाने दर्शन घेतले. राज्यातील शेतकरी, वारकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुख, समृद्धी व समाधानासाठी त्यांनी विठ्ठल चरणी प्रार्थना केली. पहाटेपासून जळगाव व धरणगाव तालुक्यातील विविध विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये जाऊन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी काकड आरतीत सहभाग घेतला. विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवत त्यांनी उपस्थित भाविकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर धरणगाव तालुक्यातील वाघळूद येथील श्री विठ्ठल मंदिरात त्यांनी दर्शन घेत महाआरती केली. यावेळी मंदिर परिसरात "विठ्ठल... विठ्ठल..."च्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. मंदिर संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी त्यांनी मंदिर परिसरातील विविध विकासकामांची पाहणी केली.

तसेच भाविकांसाठी उपलब्ध सुविधांचा आढावा घेतला. भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत त्यांनी संबंधितांशी चर्चा केली. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची वारकरी परंपरेशी असलेली नाळ सार्वजनिक जीवनात नेहमीच अधोरेखित होत आली आहे.
संत विचार, कीर्तन, भजन आणि हरिनाम सप्ताह यांसारख्या धार्मिक-सामाजिक उपक्रमांमध्ये ते सातत्याने सहभागी होत असल्याने वारकरी बांधवांमध्ये त्यांच्याबद्दल आत्मीयता आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी प्रार्थना करताना त्यांनी "राज्यात सुख, समृद्धी आणि समाधान नांदो, बळीराजा सुखी राहो आणि वारकरी संप्रदायाची सेवा अखंड सुरू राहो," अशी भावना व्यक्त केली. चिंचपूरा व वाघळूद येथे झालेल्या या भक्तिमय कार्यक्रमास स्थानिक पदाधिकारी, सरपंच, लोकप्रतिनिधी, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष, पदाधिकारी तसेच भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहाटेपासून जळगाव व धरणगाव तालुक्यातील विविध विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये जाऊन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी काकड आरतीत सहभाग घेतला. विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवत त्यांनी उपस्थित भाविकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## धरणगाव येथे कुंभार समाजाची नूतन कार्यकारिणी जाहीर

### फराळ वाटप आणि मान्यवरांच्या उपस्थितीत नव्या पदाधिकाऱ्यांचा गौरव

**जन सम्राट टाईम्स**




**भवरखेडे । प्रतिनिधी:** धरणगाव येथील किरण टॉकीज परिसरात संत गोरोबाकाका जयंती आणि आषाढी पर्वाच्या निमित्ताने कुंभार समाजाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी विठ्ठल-रुक्मिणीची आरती, फराळ वाटप आणि मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. संत गोरोबाकाका मित्र मंडळाच्या वतीने गेल्या २२ वर्षांपासून नवरात्रोत्सवासह विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा प्रथमच कुंभार समाजाची स्वतंत्र कार्यकारिणी स्थापन करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा लिलाताई सुरेश चौधरी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक उमाकांत गायकवाड, नगरसेवक सुनील चौधरी, नगरसेविका ज्योती लक्ष्मण पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी व्याख्याते लक्ष्मणराव पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा परिचय करून दिला. यावेळी सर्व मान्यवरांसह मंडळाला सातत्याने सहकार्य करणारे अरविंद चौधरी, राज चौधरी, मनोज चौधरी आणि पत्रकार अविनाश बाविस्कर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कुंभार समाजासाठी मोलाचे योगदान देणारे रविंद्र पाटील यांचाही विशेष गौरव करण्यात आला. मार्गदर्शन करताना नगरसेवक सुनील चौधरी यांनी कुंभार समाजाच्या सामाजिक आणि उपक्रमशील कार्याचे कौतुक केले. पोलीस निरीक्षक उमाकांत गायकवाड यांनी डीजे आणि भडक देखाव्याऐवजी परंपरा जपत उत्सव साजरा केल्याबद्दल मंडळाचे अभिनंदन केले तसेच कायद्याचे पालन करण्याचे महत्त्वही सांगितले. नगराध्यक्षा लिलाताई चौधरी यांनी संत गोरोबाकाका यांच्या कार्याचा गौरव करत समाजाने एकजुटीने कार्य करून नवीन पिढीपर्यंत समृद्ध परंपरा पोहोचवावी, असे आवाहन केले.

### समस्त कुंभार समाज पंच मंडळ –कार्यकारिणी

अध्यक्ष: मारुती सुरेश कुंभार उपाध्यक्ष: बापू जुलाल कुंभार सचिव: आकाश भिका कुंभार सदस्य: गोरख लोटन कुंभार सदस्य: मोहन शहादू कुंभार सदस्य: बाळू संतोष कुंभार सदस्य: पिंटू भादू कुंभार सदस्य: राहुल संतोष कुंभार प्रथमच कुंभार समाजाची स्वतंत्र कार्यकारिणी स्थापन करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा लिलाताई सुरेश चौधरी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक उमाकांत गायकवाड, नगरसेवक सुनील चौधरी, नगरसेविका ज्योती लक्ष्मण पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संत गोरोबाकाका मित्र मंडळ तसेच कुंभार समाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जळगाव ग्रामीण मतदारसंघात तीन नवीन रुग्णवाहिकांचे वितरण

**जन सम्राट टाईम्स**

**पाळधी | प्रतिनिधी :** जळगाव ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना आपत्कालीन आरोग्य सेवा वेळेत उपलब्ध व्हावी, या उद्देशाने राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जळगाव ग्रामीणचे आमदार गुलाबराव पाटील यांच्या हस्ते आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर पिंपरी, धरणगाव आणि जळगाव तालुक्यासाठी प्रत्येकी एक अशा तीन नवीन रुग्णवाहिकांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने आरोग्यसेवा उपलब्ध होणार असून गंभीर रुग्णांना वेळेत उपचारासाठी रुग्णालयात पोहोचविणे अधिक सुलभ होणार आहे. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, "जनतेचे आरोग्य हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. कोणत्याही नागरिकाला आपत्कालीन वैद्यकीय सेवेची गरज भासल्यास




त्याला तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे."

यापूर्वीही जळगाव ग्रामीण मतदारसंघात चार ते पाच रुग्णवाहिका कार्यरत असून, नव्याने तीन रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यामुळे आरोग्यसेवेचे जाळे अधिक मजबूत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व तत्पर आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# आदिवासींच्या 14 प्रमुख मागण्यांसाठी आदिवासी टायगर सेनेचे प्रशासनाला निवेदन!

## आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासह प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** आदिवासी टायगर सेनेच्या वतीने जळगाव जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत पालकमंत्री, जिल्हा परिषद, महसूल, वन, ग्रामीण विकास, महिला व बालविकास, मत्स्य व्यवसाय, उद्योग केंद्र, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. अनेक आंदोलने व उपोषणे करूनही प्रश्न सुटत नसल्याने प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनात आदिवासी समाजासाठी गावागावात स्वतंत्र दफनभूमी उपलब्ध करून तिची ७/१२ नोंद आदिवासी दफनभूमीच्या नावाने करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच जन्मनोंद नसलेल्या नागरिकांसाठी आधार कार्ड, रेशनकार्ड, जातीचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली. शबरी घरकुल योजना पुन्हा सुरू करून तिची अंमलबजावणी आदिवासी विकास प्रकल्पामार्फत करावी, नव्या रेशनकार्डधारकांसाठी स्वतंत्र धान्य कोटा वाढवावा, बेरोजगार आदिवासी युवकांना



विविध शासकीय कर्ज व रोजगार योजनांचा लाभ मिळावा, यासाठी जिल्हा उद्योग केंद्र व अग्रणी बँकेने प्रभावी अंमलबजावणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय अतिक्रमणावरील जागांचे नियमितीकरण, वनहक्क दावे निकाली काढणे, स्थानिक धरणांवरील मत्स्य व्यवसायात आदिवासींना प्राधान्य, दुर्गम वस्त्यांवर अंगणवाडी मंजूर करणे, कागदपत्रांविना वंचित असलेल्या आदिवासींना आरोग्य, शिक्षण व इतर मूलभूत अधिकार उपलब्ध करून देणे, कुलदैवतांच्या मूर्ती स्थापनेस परवानगी, एरंडोल येथे आदिवासी विकास प्रकल्पाच्या उपकार्यालयाचे काम तातडीने सुरू करणे, पोलिस ठाण्यांमध्ये आदिवासींच्या तक्रारींची दखल घेणे तसेच आदिवासी विकास प्रकल्पाच्या विविध योजनांसाठी निधी वाढविण्याच्या मागण्यांचाही समावेश आहे. प्रशासनाने संबंधित विभागांमार्फत या मागण्यांवर प्रत्यक्ष कार्यवाही करून त्याबाबतची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावर आदिवासी टायगर सेनेचे राज्य प्रवक्ता पंढरीनाथ मोरे, महासचिव सुनिल गायकवाड, जिल्हाध्यक्ष सुनिल सोनवणे, सल्लागार बाळू ठाकरे, एकनाथ गायकवाड, माजी सभापती भूषण भिल, विजय मालचे, धरणगाव शहरप्रमुख जितेंद्र मोरे, सचिव विनोद मोरे, वासुदेव गायकवाड, एरंडोल युवा अध्यक्ष आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद| प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त नशिराबाद येथे एका भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव आणि डॉ. ए. जी. भंगाळे यांचे समर्थ हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर जळगाव तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा गट), नशिराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नशिराबाद शहर अध्यक्ष मा. श्री. गणेश नथ्थू चव्हाण हे या शिबिराचे आयोजक आहेत.

**शिबिराची ठळक वैशिष्ट्ये:**
तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांचे मार्गदर्शन व प्राथमिक तपासणी केली जाईल. शिबिरात डॉक्टरांच्या सल्ल्याने मोफत ECG काढण्यात येईल तसेच BP Monitor तपासणी केली जाईल. मुख कर्करोग तपासणी शिबिर व त्यावरील उपचाराविषयी मार्गदर्शन केले जाईल. स्तन कर्करोग तपासणी व उपचारासाठी उपलब्ध सुविधांबाबतीत मार्गदर्शन मिळेल. तसेच विशेष स्त्री आरोग्य तपासणी शिबिर देखील आयोजित केले आहे.

**तपशील:** पत्ता:* श्री इच्छापूर्ती हॉल, कल्पना गणेश मंडळ, जैन मंदिराजवळ, नशिराबाद. दिनांक:* २६/०७/२०२६, रविवार. वेळ:* सकाळी ९:३० ते दुपारी १ वाजेपर्यंत. या शिबिराच्या आयोजनासाठी नशिराबाद शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी तसेच सर्व मित्र परिवार यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. तसेच अनमोल सहकार्यात नशिराबाद नगरपरिषदेच्या नगरसेविका नसब्रीन बानो शेख मुश्ताक आणि नगरसेवक मनियार आसिफ शेख गनी शेख यांचा सहभाग आहे.

नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जयेश पाटील (९१९४५१८६०१९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर आंबेडकरी संघटनांचा जल्लोष!

## फटाक्यांची आतषबाजी; आंदोलनाचे स्वागत



जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी:** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या वृत्तानंतर धुळ्यात आंबेडकरी संघटनांच्या वतीने जल्लोष करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाके फोडले, पेढे वाटले आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मिळालेल्या यशाचा आनंद व्यक्त केला. यावेळी आझाद समाज पार्टी, भीम आर्मी, वंचित बहुजन आघाडी यांच्यासह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नीट (NEET) परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि अनियमिततेच्या मुद्द्यावरून देशभरातील विद्यार्थी संघटनांनी आंदोलन सुरू केले होते. दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी आंदोलन करत शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांकडून झालेल्या कारवाईविरोधातही देशभरात विविध संघटनांनी निषेध व्यक्त केला होता. विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण संघर्ष, विविध सामाजिक संघटनांचा वाढता दबाव आणि आंदोलनाची तीव्रता यामुळे केंद्र सरकारला निर्णय घ्यावा लागल्याची भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाके फोडले, पेढे वाटले आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मिळालेल्या यशाचा आनंद व्यक्त केला.

धुळ्यातील आंबेडकरी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी "विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्याचा विजय झाला" अशी भावना व्यक्त करत घोषणाबाजी केली. यावेळी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.नीट (NEET) परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि अनियमिततेच्या मुद्द्यावरून देशभरातील विद्यार्थी संघटनांनी आंदोलन सुरू केले होते. दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी आंदोलन करत शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांकडून झालेल्या कारवाईविरोधातही देशभरात विविध संघटनांनी निषेध व्यक्त केला होता.

# NEET-TET पेपरफुटीच्या निषेधार्थ भुसावळात विद्यार्थ्यांचा विराट मोर्चा

## शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

भुसावळ | प्रतिनिधी : देशातील NEET, TET आणि इतर स्पर्धा परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेण्यात याव्यात, पेपरफुटीच्या घटनांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी भुसावळ शहरात विद्यार्थ्यांचा विराट मोर्चा काढण्यात आला.

रेल्वे स्टेशन परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून दुपारी २ वाजता मोर्चाला सुरुवात झाली. या मोर्चात सुमारे ६ ते ७ हजार विद्यार्थी, पालक तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. "विद्यार्थ्यांना न्याय द्या", "पेपरफुटी बंद करा", "शिक्षणमंत्री राजीनामा द्या" अशा घोषणांनी संपूर्ण शहर परिसर दणाणून गेला. मोर्चानंतर विद्यार्थी प्रतिनिधी विवेक सपकाळे, फैजान शेख, अभय सोनवणे, प्रथम



बोदडे, अश्विन नरवाडे, जबाद खान, अनिकेत सोनवणे, तय्यब शेख, सय्यद दानिश आणि हुसेन शहा यांनी भुसावळचे प्रांताधिकारी यांना निवेदन सादर केले. निवेदनात NEET पेपरफुटी प्रकरणाची तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच देशातील परीक्षा प्रणाली अधिक विश्वासार्ह करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी सांगितले की, भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहोत. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेविरोधात हा लढा सुरूच राहील. सरकारने तातडीने ठोस निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. विद्यार्थ्यांनी पुढे सांगितले की, स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील अनियमितता, वाढती बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. देशाचे भविष्य घडविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

# 'विठ्ठल... विठ्ठल'च्या जयघोषात भुसावळहून पंढरपूरकडे विशेष रेल्वे रवाना

## केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते हिरवा झेंडा

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर भुसावळ रेल्वे स्थानकातून पंढरपूरकडे जाणाऱ्या विशेष रेल्वेला केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. "विठ्ठल... विठ्ठल..." आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने संपूर्ण रेल्वे स्थानक भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. विशेष रेल्वेतून पंढरपूरच्या दिशेने रवाना होणाऱ्या हजारो वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. टाळ-मृदंगाचा गजर, भगव्या पताका, अभंग गायन आणि विठ्ठलनामाच्या अखंड घोषात भाविकांनी विठुरायाच्या दर्शनासाठी प्रस्थान केले. यावेळी रक्षा खडसे यांनी वारकऱ्यांशी संवाद साधत आषाढी वारीच्या शुभेच्छा दिल्या तसेच सुखरूप प्रवासासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. वारकऱ्यांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाने सुरक्षा व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच मार्गदर्शनासाठी विशेष कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती.



माध्यमांशी बोलताना रक्षा खडसे म्हणाल्या, "राजकारणाच्या पलीकडे जाऊन वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे माझ्यासाठी भाग्याची बाब आहे. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असून त्यांच्या सेवेसाठी शासन आणि प्रशासन कटिबद्ध आहे." रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, आषाढी वारीसाठी दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक रेल्वेने पंढरपूरकडे प्रवास करतात. यंदाही विशेष रेल्वेची सुविधा उपलब्ध करून दिल्याने हजारो वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि सोयीस्कर होणार आहे. विशेष रेल्वेला निरोप देण्यासाठी नागरिक, रेल्वे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात रेल्वे रवाना होताच वारकऱ्यांनी "विठ्ठल... विठ्ठल..." आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला.विशेष रेल्वेतून पंढरपूरच्या दिशेने रवाना होणाऱ्या हजारो वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. टाळ-मृदंगाचा गजर, भगव्या पताका, अभंग गायन आणि विठ्ठलनामाच्या अखंड घोषात भाविकांनी विठुरायाच्या दर्शनासाठी प्रस्थान केले. यावेळी रक्षा खडसे यांनी वारकऱ्यांशी संवाद साधत आषाढी वारीच्या शुभेच्छा दिल्या तसेच सुखरूप प्रवासासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. रेल्वे प्रशासनाने सुरक्षा व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच मार्गदर्शनासाठी विशेष कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली.

# वरणगावात ५.१७ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त!

जन सम्राट टाईम्स

**वरणगाव। प्रतिनिधी:** महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेला ₹५ लाख १७ हजार ८६८ किमतीचा गुटखा व पानमसाल्याचा साठा वरणगाव पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकासह केलेल्या संयुक्त कारवाईत जप्त केला. या कारवाईत वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली सिल्व्हर रंगाची इनोव्हा (एमएच-२० बीडी-३०००) कारही जप्त करण्यात आली असून, एका संशयिताला ताब्यात घेण्यात



आले आहे. ही कारवाई २४ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ८.२० वाजता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील मुक्ताईनगर–भुसावळ मार्गावरील कपीलवस्ती परिसरात करण्यात आली. संशयित वाहनाची तपासणी केली असता महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेला विविध प्रकारचा गुटखा, केसरयुक्त विमल पानमसाला आणि इतर तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. कारवाईदरम्यान विंग तंबाखू, केसरयुक्त विमल पानमसाला, करमचंद प्रीमियम पानमसाला, केसी-1000 यांसह विविध प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आणि इनोव्हा कार असा एकूण ₹५,१७,८६८ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासासाठी प्रत्येक प्रकारातील नमुनेही घेण्यात आले आहेत. या प्रकरणी चेतन लक्ष्मण नारखेडे (वय २८, रा. नशिराबाद, ता. जि. जळगाव) याच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमान्वये वरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धरणगाव–एरंडोल पुलावरील जीवघेणे खड्डे तात्काळ बुजवा!

## माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील यांची मागणी



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव शहरातील उड्डाणपुलाकडून एरंडोलकडे जाणाऱ्या मार्गावरील पुलाजवळ मोठे आणि जीवघेणे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे वारंवार अपघात घडत असून संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन खड्डे बुजवून रस्ता पूर्ववत करावा, अशी मागणी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील यांनी केली आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी या खड्ड्यात दुचाकी घसरून दोन ज्येष्ठ नागरिक जखमी झाल्याची घटना घडली. सुदैवाने त्यावेळी मागून कोणतेही मोठे वाहन आले नसल्याने मोठा अनर्थ टळला. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने रिक्षाद्वारे रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राध्यापक भदाणे यांनीही मदतकार्य केले. जखमींच्या डोक्याला व पायाला किरकोळ दुखापत झाल्याची माहिती मिळाली. या मार्गावरून दररोज शेकडो वाहने, शालेय बस, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवासी ये-जा करतात. त्यामुळे खड्ड्यांमुळे मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. परिसरातील नागरिकांनीही रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नाराजी व्यक्त केली. पी. एम. पाटील यांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाला दोन दिवसांच्या आत रस्त्याची दुरुस्ती करून खड्डे बुजवण्याची मागणी केली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना न केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला. आषाढी एकादशीच्या दिवशी या खड्ड्यात दुचाकी घसरून दोन ज्येष्ठ नागरिक जखमी झाल्याची घटना घडली. सुदैवाने त्यावेळी मागून कोणतेही मोठे वाहन आले नसल्याने मोठा अनर्थ टळला. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने रिक्षाद्वारे रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राध्यापक भदाणे यांनीही मदतकार्य केले. जखमींच्या डोक्याला व पायाला किरकोळ दुखापत झाल्याची माहिती मिळाली.

# भाविकांसह बालदिंडीतील विद्यार्थ्यांना साबुदाणा खिचडी व केळीचे वाटप

## संजय पाटील यांच्या पुढाकाराने महाप्रसाद; पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी पूजन

जन सम्राट टाईम्स

**पाळधी | प्रतिनिधी :** देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पाळधी येथे धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले. एरंडोल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा पाळधी खुर्दचे माजी सरपंच संजय पाटील यांच्या पुढाकाराने भाविक भक्तांसाठी एक क्विंटल साबुदाणा खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले. येथील शासकीय विश्रामगृहाजवळील दत्त मंदिरासमोरील प्रांगणात आयोजित या उपक्रमात




दर्शनासाठी आलेले भाविक तसेच विविध शाळांमधून निघालेल्या बालदिंडीतील विद्यार्थ्यांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी राज्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, उद्योजक सुनील झंवर, दिलीप पाटील आणि अनिल कासट यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी उपस्थितांना आषाढी एकादशीचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व सांगत शुभेच्छा दिल्या. वारकरी परंपरेत सेवा, समता आणि भक्ती यांचे महत्त्व अधोरेखित करत समाजात एकोपा जपण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पवन सोनवणे, माजी सरपंच हेमंत पाटील, बारसु माळी, सागर पाटील, सुभाष कापुरे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यावेळी श्रीराम ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष शरद कासट, विक्रम पाटील, चंदू माळी, डिगू माळी, संदीप पाटील, सचिन महाले, दीपक झंवर, मुन्ना झंवर, राजू क्षीरसागर, चंद्रमणी नन्नवरे, एसपी मित्रपरिवाराचे सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाल सोनवणे यांनी केले.देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पाळधी येथे धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले. एरंडोल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा पाळधी खुर्दचे माजी सरपंच संजय पाटील यांच्या पुढाकाराने भाविक भक्तांसाठी एक क्विंटल साबुदाणा खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306